कामासाठी हुशार व अनुभवी
वय १८ वर्षापुढील मुली-मुले पाहिजे.
शैक्षणिक पात्रता-कॉम्प्युटर
मधील MS-CIT- कोर्से,
DIGITAL-MARKATING
संपर्क-सा.प्रगत भारत वृत्तपत्र व
ऑफीस नंबर २४ साई कृपा भवन
मुंबई-पुणे रोड खराळवाडी पिंपरी
पुणे-४११०१८
9860 877 789

गॅस सिलेंडरचा मोह सोडा,पुरवठा होणार बंद? मंत्री छगन भुजबळांनी दिले स्पष्ट संकेत
( पान क्रमांक-३ वर)

साप्ताहिक
# प्रगत भारत
Web:www.pragatbharat.com,youtube-pragatbhart,Em-pragagatbhart@gmail.com,mo.9860877789




● वर्ष:१८ ● अंक क्र. ३७ ● साप्ताहिक ● मंगळवार दि.३१ मार्च ते ६ एप्रिल २०२६ ● RNI/MAH/MRA/2008/25149 ● RNP/पोस्ट- PCE/006/2024-2026 ● पृष्ठे-४ ● किंमत:२.००

## क्राईस्ट युनिव्हर्सिटी (पुणे लवासा) येथील विधी डिपार्टमेंर्ट(विधी विभागा) यांच्यावतीने ६ वी मूट कोर्ट स्पर्धाचे यशस्वी आयोजन

**पुणे:**-क्राईस्ट युनिव्हर्सिटी (पुणे लवासा) येथील विधी LAw डिपार्टमेंर्ट(विधी विभागा) द्वारे ६ वी मूट कोर्ट स्पर्धा दिनांक २७ ते २९ मार्च २०२६ या कालावधीत यशस्वीरित्या आयोजित केली.
या स्पर्धेत एकूण ३,००,००० रुपयांची बक्षीस रक्कमेसह सर्वोत्कृष्ट वक्ता, सर्वोत्कृष्ट संशोधक आणि सर्वोत्कृष्ट मेमोरियल(लिखित युक्तिवाद) यांसाठी वैयक्तिक पुरस्कारांचा ही समावेश होता.
२०२६ च्या मूट स्पर्धेचा विषय घटनात्मक कायदा,संघराज्य पद्धती आणि डेटा प्रशासन यांसारख्या समकालीन मुद्द्यांवर आधारित होता.सहभागी सततबदलणारह्या कायदेशीर आव्हानांचा सखोलअभ्यास करण्यास प्रोत्सहान मिळाले.या स्पर्धेत देशभरातील ३० संघांनी सहभाग घेतला.ज्यामध्ये देशा-तील १० हून अधिक नॅशनल लॉ(LAw)स्कूल्सचा समावेश होता, यामुळे थिमिक्स ही एक प्रमुख राष्ट्रीय स्तरावरील स्थान अधिक बळकट झाले.प्राथमिक आणि उपांत्यपूर्व फेऱ्यांचे परीक्षण परीक्षक समिती अनुभवी प्राध्यापक आणि वकिलांनी केले.







ज्यामुळे मूल्यमाणाचा सनिश्चित झाला.उपांत्य (सेमी-फायनल) फेऱ्यांची परिक्षण:मोहम्मद जफर इमाम(माजी प्रधान न्यायाधीश) आणि कॅप्टन पंकज कपूर (संचालक,क्वाड्रंट लीगल) यांनी परीक्षण केले.
अंतिम फेरीचे प्रशिक्षण एका प्रतिष्ठित समितीने केले कि ज्यामध्ये माननीय न्यायमूर्ती श्री.अशिम कुमार रॉय-माजी उच्चन्यायालय न्यायाधिश,माजीलोकायुक्त प्रा.(डॉ) ज्यात्स्ना याज्ञिक माजी प्रधान न्यायाधिश आणि प्र.कुलगुरू आणि प्रा.(डॉ)सुबीर कुमार रॉय(माजी प्रभारी कुलसचिव)यांचा समावेश होता.त्यांची तज्ज्ञान व सखोल अंतदृष्टी यामुळे सर्वसहभागी स्पर्धेचा अनुभव आधिकच समृध्दझाला या स्पर्धेत अनुभव अधिकच समृध्द झाला.यास्पर्धेत NLU जोधपूर ने विजेतेपदाची चषक पटकावला तर निर्माविद्यापीठ संघ उपविजेता ठरला.
या स्पर्धेचा समारोप एका भव्य समारंभाने झाला.या समारंभाला भारताचे माजी सरन्यायाधिश न्यायमुर्ती श्री.उदय उमेश ललित यांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्यांच्या उपस्थिती मुळे या प्रसंगाची प्रतिष्ठा वाढली.थेमीस २०२६ स्पर्धेचा समारोप अत्यंत यशस्वी आणि उत्साहपूर्ण वातावरणात झाली.
या स्पर्धेने देशभरातील विधी शाखेच्या विद्यार्थ्यांमध्ये कायदेशी कुशाग्रता,युक्तिवाद कौशल्ये आणि शैक्षणिक उत्कृष्टता जोपासण्याचे कार्य यशस्वीरित्या पार पाडले.

adv

## फ्लॅटधारकांना पाणीपुरवठा करण्याची जबाबदारी पार न पाडल्यास कठोर कारवाई करणार-आयुक्त डॉ.विजय सूर्यवंशी




**पिंपरी:-पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत ज्या विकसकांनी फ्लॅटधारकांना ताबा देण्यापूर्वी पाणीपुरवठ्याची जबाबदारी स्वीकारत लेखी हमीपत्र दिले आहे, त्यांनी ती जबाबदारी काटेकोरपणे पार पाडणे बंधनकारक आहे. संबंधित जबाबदारीकडे दुर्लक्ष केल्यास किंवा पाणीपुरवठ्याचा अन्यायकारक आर्थिक भार सोसायट्यांवर टाकल्यास महानगरपालिका संबंधितांविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई करेल, असा स्पष्ट इशारा पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिला.**
मुंबई उच्च न्यायालयातील १० एप्रिल २०२३ रोजीच्या जनहित याचिकेच्या अनुषंगाने पाणीपुरवठ्याबाबत स्थापन करण्यात आलेल्या समितीची बैठक नुकतीच पार पडली. यावेळी ते बोलत होते.पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या बैठकीस पिंपरी चिंचवड महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे,सह शहर अभियंता अजय सूर्यवंशी, कार्यकारी अभियंता महेश बरिदे यांच्यासह पुणे महापालिका तसेच पीएमआरडीएचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.बैठकीदरम्यान पिंपरी चिंचवड व पुणे महानगरपालिका क्षेत्रातील विविध गृहनिर्माण सोसायट्यांना भेडसावणाऱ्या पाणीटंचाईच्या समस्यांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.
**(क्रमशा पान क्रमांक-२)**

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून महाराष्ट्र केसरी हर्षवर्धन सदगीरचे अभिनंदन

**पुणे:महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वाघोली येथे झालेल्या ६८ वा महाराष्ट्र केसरी विजेता हर्षवर्धन सदगीर यांच्यासह स्पर्धेचे आयोजक रामकृष्ण सातव यांनी भेट घेतली. मुख्यमंत्र्यांनी हर्षवर्धन सदगीर यांच्या कामगिरीचे तसेच स्पर्धेच्या यशस्वी आयोजनाबद्दल महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघ व आयोजकांचे अभिनंदन केले. यावेळी महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे कार्याध्यक्ष पै.संदीप भोंडवे,पुणे जिल्हा कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष मा. मेघराज कटके,केतन जाधव उपस्थित होते.**



## १२० वर्षाच्या साहित्य परिषदेच्या इतिहासात प्रथमच मागासवर्गीय प्रतिनिधी विजयी
### ओव्हाळ हे साहित्य परिषदेत मिळालेल्या संधीचे सोनं करतील- डॉ श्रीपाल सबनीस



**पिंपरी**-महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या १२० वर्षाच्या इतिहासात उपेक्षित वर्गाचे प्रतिनिधी म्हणून निवडून आलेले प्रभाकर ओव्हाळ हे मिळालेल्या संधीचे सोनं करतील,असा विश्वास ज्येष्ठ साहित्यिक व माजी संमेलनाध्यक्ष डॉ.श्रीपाल सबनीस यांनी आज येथे व्यक्त केला.सोहम सार्वजनिक ग्रंथालय,अंशुल प्रकाशन व जगद्गुरु प्रतिष्ठानच्या वतीने महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या पुणे जिल्हा प्रमुख पदी निवडून आल्याबद्दल जेष्ठ साहित्यिक प्रभाकर ओव्हाळ व कविवर्य राजन लाखे यांच्या सत्कारानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. संत तुकाराम नगर येथील सोहम ग्रंथालयात हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. महापौर रवी लांडगे, गझलकार व साहित्य परिषदेचे कोषाध्यक्ष प्रदीप निफाडकर, सामाजिक कार्यकर्ते मानव कांबळे,संयोजक जगन्नाथ नेरकर, ॲड लक्ष्मण रानवडे, पत्रकार व लेखक विजय जगताप आदी यावेळी उपस्थित होते. "आपल्या लेखणीतून उपेक्षित समाजातील वेदनांना न्याय मिळवून देण्याचे श्री ओव्हाळ यांनी आयुष्यभर काम केले, ते समरसतेची गुढी उभारतील" असा विश्वास डॉ श्रीपाल सबनीस यांनी व्यक्त केला. महापौर रवी लांडगे यांनी आपल्या भाषणात, नवनिर्वाचित दोन्ही सदस्य शहराचे भूषण व अभिमान असून साहित्य परिषदेच्या उपक्रमांना महापालिका सदैव पाठीशी असेल, असे म्हटले. यावेळी निफाडकर, मानव कांबळे यांचीही भाषणे झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गिरीश वाघमारे यांनी केले तर विष्णू मांजरे यांनी आभार मानले.

## माजी नगरसेवक डॉ.हुलगेश चलवादी यांनी आरपीआय (आ) पक्षात प्रवेश

**पुणे:-बहुजन,दलित तसेच वंचित-पीडित-उपेक्षितांचा बुलंद आवाज रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आ) पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष, केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री मा.रामदास आठवले यांच्या दुरदृष्टी तसेच समाजभिमुख नेतृत्वाने प्रेरित होवून बहुजन नेते, माजी नगरसेवक डॉ.हुल-गेश चलवादी यांनी आरपीआय (आ) पक्षात प्रवेश केला आहे.**
पुण्यात नुकत्याच पार पडलेल्या कार्यक्रमात मा.आठवले साहेबांच्या प्रमुख उपस्थितीत हा पक्षप्रवेश करतांना डॉ.चलवादी यांनी साहेबांच्या नेतृत्वात बहुजन चळवळीसाठी काम करण्याचा निर्धार केला आहे.डॉ.चलवादी यांच्यासह बसपचे पुणे जिल्हा प्रभारी अनिल त्रिपाठी,चलवादी माळा विकास महासंघाचे अध्यक्ष भीम सिंह चलवादी,ॲड.प्रदीप चिंचोलीकर,निवृत्त आयपीएस अधिकारी अविनाश मस्के, निवृत्त प्रॉव्हिडंट फंड आयुक्त विकास जावळे,प्रकाश सोनवणे,सुधीर वाघमोडे,माजी नगरसेवक संतोष आरडे यांनी पक्षप्रवेश केला.
कार्यक्रमात पक्षाचे प्रदेशाध्यक्ष राजाभाऊ सरवदे, प्रदेश महासचिव गौतम सोनवणे, प्रदेश सचिव बाळासाहेब जानराव,आरपीआय (आ) पक्षाचे शहराध्यक्ष संजय



सोनवणे, पुण्याचे उपमहापौर परशुराम वाडेकर, नगरसेविका चंद्रकांता सोनकांबळे, नगरसेविका हिमाली कांबळे, नगरसेवक निलेश आल्हाट, इतर माजी नगर सेवक व पुणे व प्रदेश कार्यकारिणीचे प्रमुख पदाधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते.मा.आठवले साहेबांच्या नेतृत्वात बहुजन चळवळीला नवी ऊर्जा मिळणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

## सामान्यांचे बजेट कोलमडणार;'या' वस्तूच्या किमतीत मोठी दरवाढ

**दिल्ली**-मध्य पूर्वेतील युद्धस्थितीमुळे जागतिक बाजारपेठेत मोठे आर्थिक परिणाम दिसून येत आहेत. या संघर्षाचा परिणाम भारतावरही स्पष्टपणे जाणवत आहे. इंधन आणि ऊर्जेच्या पुरवठ्यावर परिणाम झाल्यानंतर आता रोजच्या वापरातील खाद्यतेलाच्या किमतीत वाढ झाली आहे. त्यामुळे सामान्य नागरिकांच्या घरखर्चावर अतिरिक्त ताण येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.अमेरिका,इस्त्रायल आणि इराण यांच्यात निर्माण झालेल्या तणावपूर्ण परिस्थितीचा परिणाम केवळ त्या प्रदेशापुरता मर्यादित राहिलेला नाही. या संघर्षामुळे जगभरातील अनेक देशांच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम होत आहे आणि भारत देखील त्याला अपवाद ठरलेला नाही. युद्धाच्या पार्श्वभूमीवर ऊर्जा क्षेत्रावर विशेष ताण निर्माण झाला असून भारतात ऊर्जा संकटाची स्थिती निर्माण होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.इराणने होर्मुझ सामुद्रधुनी बंद केल्यामुळे जागतिक पातळीवर ऊर्जा पुरवठ्याच्या साखळीवर परिणाम झाला आहे. त्याचा थेट परिणाम भारतातील नैसर्गिक वायू आणि एल-पीजी गॅसच्या उपलब्धतेवर दिसत आहे. अनेक भागांमध्ये एलपीजीची टंचाई निर्माण होत असून घरगुती गॅस सिलिंडरचे दरही वाढले आहेत. त्याचबरोबर व्यावसायिक वापरासाठी असलेला गॅस वेळेवर उपलब्ध न झाल्याने औद्योगिक क्षेत्रालाही फटका बसत आहे.



# जिद्द-शिस्तीशिवाय स्पर्धा परीक्षेत यश अशक्य-मिलिंद नारिंगे

## पुणे दौऱ्यात 'महाज्योती'कडून गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



**पुणे:स्पर्धा परीक्षांच्या कठीण रणांगणात यश मिळवायचे असेल,तर केवळ अभ्यास पुरेसा नसून जिद्द,शिस्त आणि योग्य मार्गदर्शन हीच खरी यशाची गुरुकिल्ली आहे,असा ठाम विश्वास 'महाज्योती'चे व्यवस्थापकीय संचालक मिलिंद नारिंगे यांनी व्यक्त केला.**

पुणे दौऱ्यात विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधत त्यांनी यशस्वी होण्यासाठी आवश्यक दिशा दिली आणि आत्मविश्वासाची नवी ऊर्जा निर्माण केली. महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती),नागपूरचे व्यवस्थापकीय संचालक मिलिंद नारिंगे यांनी शनिवारी (२१ मार्च २०२६) पुण्यातील युनिक स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण केंद्र आणि ज्ञानदीप स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण केंद्राला भेट देत प्रशिक्षण व्यवस्थेचा सखोल आढावा घेतला. या दौऱ्यात त्यांनी विद्यार्थ्यांच्या अडचणी जाणून घेत स्पर्धा परीक्षांकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहण्याचा सल्ला मिलिंद नारिंगे यांनी दिला.विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मिलिंद नारिंगे म्हणाले की, स्पर्धा परीक्षा म्हणजे फक्त प्रश्नपत्रिका नव्हे, तर स्वतःला सिद्ध करण्याची मोठी संधी आहे. सातत्य, आत्मविश्वास आणि योग्य दिशा असेल, तर कोणतीही पार्श्वभूमी यशाच्या आड येऊ शकत नाही. 'महाज्योती' प्रत्येक विद्यार्थ्याच्या पाठीशी ठामपणे उभी आहे. त्यांच्या या शब्दांनी विद्यार्थ्यांमध्ये नवचैतन्य आणि आत्मविश्वास निर्माण झाला. या दौऱ्यावेळी विविध राष्ट्रीय व राज्यस्तरीय स्पर्धा परीक्षांत यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आले. यात युनिक अकॅडमीमधील केंद्रीय लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण करणारे धनंजय संजय दिघे (५२९ वा क्रमांक) यांचा विशेष गौरव करण्यात आला. तसेच ज्ञानदीप अकॅडमीमधील सुरज गावडे (गट विकास अधिकारी),कोमल पाटोळे (उपविभागीय पोलिस अधिकारी) आणि शुभम तिजारे (लेखा व वित्त अधिकारी) या यशस्वी विद्यार्थ्यांचाही सन्मान करण्यात आला. याप्रसंगी 'महाज्योती'च्या पुणे विभागीय कार्यालयातील सहायक संशोधन अधिकारी पल्लवी कडू तसेच कर्मचारी विकास झोडगे उपस्थित होते. त्यांनी प्रशिक्षण केंद्रांतील विविध उपक्रमांची माहिती देत विद्यार्थ्यांना उपलब्ध असलेल्या सुविधा आणि सहाय्याचा आढावा सादर केला.

# आरपीआय शहराध्यक्षपदी विलास कांबळे आणि सरचिटणीस पदावर दयानंद वाघमारे यांची निवड जाहीर



**पिंपरी:**केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले यांच्या नेतृत्वाखाली शिव, फुले, शाहू यांचे विचार तळागाळापर्यंत पोहोचवण्याचे काम पिंपरी चिंचवड शहरात करीत आहोत, हेच काम आणखी जोमाने करण्यासाठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाची पिंपरी चिंचवड शहर नवीन कार्यकारणी जाहीर करत असल्याची माहिती आरपीआय प्रदेश उपाध्यक्ष बाळासाहेब भागवत यांनी पिंपरी येथे आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत दिली.पिंपरी चिंचवड शहर जिल्हाध्यक्ष पदावर विलास कांबळे यांची निवड करण्यात आली आहे. तसेच सरचिटणीस दयानंद वाघमारे, कार्याध्यक्ष बाळासाहेब रोकडे आणि लिंबराज कांबळे, वरिष्ठ उपाध्यक्ष दिलीप नाना साळवे यांच्यासह इतर पदांवर देखील कार्यकर्त्यांना संधी देण्यात आली आहे अशी माहिती आरपीआय पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष के. एम. बुक्तर यांनी यावेळी दिली.या पत्रकार परिषदेस सरचिटणीस, अ.आ.म.प. खाजाभाई शेख, पश्चिम महाराष्ट्र सचिव रमेश चिमूरकर, पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष अंकुश कानडी,आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# मंदिरांच्या सर्व समस्यांसाठी मुख्यमंत्र्यांसमवेत बैठक घेऊन त्यावर तोडगा काढू!-भरतशेठ गोगावले,फलोत्पादन आणि रोजगार हमीमंत्री



सातारा-मंदिरे सुरक्षित तर धर्म सुरक्षित ! मंदिर महासंघाने एकत्र येऊन मंदिरांची जी वज्रमूठ बांधलेली आहे, तिला सरकाचे पूर्ण पाठबळ असेल.मंदिरांसाठी जमिनी खरेदी करतांना अथवा हस्तांतरण करतांना मुद्रांत शुल्कात सवलत मिळावी, ही मंदिरांची मागणी योग्य असून त्यावर अर्थ विभागाशी चर्चा करून धोरणात्मक निर्णय घेण्यात येईल!मंदिरांच्या जमिनी बळकावणाऱ्यांना चाप लावण्यासाठी शासन 'अँटी लँड ग्रबिंग'कायद्याच्या धर्तीवर अधिक कठोर पावले उचलण्याचा विचार करत आहे.या परिषदेत जे ठराव होतील,तसेच मंदिरांच्या ज्या ज्या मागण्या असतील, समस्या असतील त्यावर मुख्यमंत्र्यांसमवेत विशेष बैठक बोलावून सकारात्मक तोडगा काढला जाईल,अशी ग्वाही फलोत्पादन आणि रोजगार हमीमंत्री भरतशेठ गोगावले यांनी दिली.

महाराष्ट्र मंदिर महासंघ, मुंबई येथील श्री जिवदानी देवी संस्था, श्री ज्योतिर्लिंग भीमाशंकर देवस्थान आणि हिंदु जनजागृती समिती यांच्या संयुक्त विद्यमाने २२ मार्चला सातारा येथील स्वराज मंगल कार्यालय, कोरेगाव रस्ता, सातारा येथे चतुर्थ 'महाराष्ट्र मंदिर न्यास परिषद आयोजित करण्यात आली आहे.या परिषदेत ते बोलत होते.

या परिषदेला संपूर्ण महाराष्ट्रभरातून १ हजार १०० हून अधिक निमंत्रित मंदिराचे विश्वस्त, प्रतिनिधी, पुरोहित, मंदिरांच्या रक्षणासाठी लढा देणारे अधिवक्ते,अभ्यासक आदी सहभागी झाले होते. सूत्रसंचालन हिंदु जनजागृती समितीच्या भक्ती डाफळे यांनी केले.प्रारंभी उपस्थितांचे स्वागत मंदिर महासंघाचे सातारा जिल्हा समन्वयक शिवाजीराव तुपे म्हणाले ''या परिषदेला सनातन धर्माचे प्रतिक असलेल्या देवळांचे प्रतिनिधी म्हणून आपण उपस्थित आहेत. या परिषदेत होणारे विविध विषय प्रत्यक्ष मंदिरांच्या कृतीच्या स्तरावर आणण्याचा निश्चय करूया.''मंदिर महासंघाचे प्रेरणास्रोत आणि सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांनी दिलेल्या संदेशाचे वाचन सद्गुरु सत्यवान कदम यांनी केले. महासंघाचे राष्ट्रीय संघटक श्री. सुनील घनवट यांनी एकूणच मंदिर महासंघाची वाटचाल, मंदिरांपुढील आव्हाने,तसेच यापुढील काळात मंदिरांनी संघटित स्तरावर कोणत्या कृती कराव्यात यावर विस्तृत विवेचन केले.

# शिकण्यासाठी वेळ घालवला,तर देशाचा विकास-प्रशांत जोगळेकर(एमसीसीआयए) संचालक

## पिं.चिं.विद्यापीठ येथे ''सॅमसंग इनोव्हेशन कॅम्पस''(एसआयसी)प्रमाणपत्र वितरण समारंभात संपन्न




**पिंपरी:**उद्योग संस्था आणि शिक्षण संस्था यांनी एकत्रित येऊन विद्यार्थ्यांना संशोधन,उद्योजकता आणि कौशल्य आधारित करिअरच्या दिशेने वाटचाल करण्यासाठी प्रोत्साहन द्यावे असे प्रतिपादन मराठा चेंबर्स ऑफ कॉमर्स,इंडस्ट्रीज अँड ॲग्रीकल्चरचे (एमसीसीआयए) संचालक प्रशांत जोगळेकर यांनी केले.

पिंपरी चिंचवड विद्यापीठ (पीसीयू) येथे ''सॅमसंग इनोव्हेशन कॅम्पस''(एसआयसी) प्रमाणपत्र वितरण समारंभात जोगळेकर यांनी नवोपक्रम आणि कौशल्य विकासाचे महत्व या विषयावर विद्यार्थ्यांशी संवाद साधला.विद्यार्थ्यांनी आपला वेळ नियोजन पूर्वक पद्धतीने शिकण्यासाठी घालवला तर तुमचा, तुमच्या कुटुंबियांचा आणि देशाचा विकास होईल असेही जोगळेकर यांनी सांगितले.

यावेळी सॅमसंग इनोव्हेशन कॅम्पसचे प्रोजेक्ट मॅनेजर डॉ.शशांक द्विवेदी,युएसडीसी टेक्नॉलॉजीचे संचालक हुसेन हाजीते,बाळासाहेब झरेकर, विजय कुलकर्णी,पीसीईटी कार्यकारी संचालक डॉ.गिरीश देसाई,पीसीयू कुलगुरू डॉ. संतोष सोनवणे,प्र-कुलगुरू डॉ.सुदीप डी. थेपडे,डॉ.अभिजित बनुबकोडे आदी उपस्थित होते.डॉ. शशांक द्विवेदी यांनी सांगितले की,''सॅमसंग इनोव्हेशन कॅम्पस''(एसआयसी) चा ४२ देशांमध्ये मध्ये उद्योग,व्यवसाय विस्तारलेला आहे. जागतिक स्तरावर एसआयसी विद्यार्थ्यांना एआय चे महत्व आणि सातत्याने कौशल्य वृद्धी चे महत्त्व समजून देण्यासाठी काम करत आहे. पीसीईटी कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी सांगितले की,युएसडीसी टेक्नॉलॉजी संचालक,एसआयसी प्रतिनिधी यांच्याशी समन्वय साधून पीसीयू मध्ये शिक्षण संस्था आणि उद्योग संस्था यांच्यातील सहकार्य प्रकल्प विकसित करण्यात आले आहेत.यामुळे पीसीईटी सह पीसीयूच्या विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष उद्योग,व्यवसायातील अनुभव मिळणार आहे.यामुळे गुणवत्ता वाढ होऊन त्यांच्या मध्ये नेतृत्व गुण आणि उद्योग, व्यवसायासाठी आत्मविश्वास वृद्धिंगत होण्यास मदत होईल.कार्यक्रमात गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.

पीसीयूचे कुलगुरू डॉ. संतोष सोनवणे यांनी सांगितले की, येथील शिक्षण हे कौशल्य व प्रत्यक्ष अनुभव यावर आधारित आहे.प्र-कुलगुरू डॉ.सुदीप थेपडे म्हणाले की,''एसआयसी''राष्ट्र निर्मिती मध्ये महत्त्वपूर्ण योगदान देत आहे.हुसेन हाजीते यांनी सांगितले की,आता सॅमसंग प्रमाणित अभ्यासक्रम आणि परिणाम आधारित शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित झाले आहे. तसेच पुण्यातील निवडक संस्थांमध्ये पीसीयूचा समावेश असल्याचा अभिमान वाटतो.

आभार डॉ.अभिजित बनुबकोडे यांनी मानले.कुलपती तथा पीसीईटीचे विश्वस्त हर्षवर्धन पाटील,पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे,उपाध्यक्ष पद्माताई भोसले,सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, उद्योजक नरेंद्र लांडगे,अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ.गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन करण्यात आले होते तसेच प्रमाणपत्र प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# पिंपरी चिंचवडमध्ये आयुर्वेदासाठी ऐतिहासिक पाऊल!



**पिंपरी:**२७ मार्च २०२६ कै.मधुकर पवळे सभागृह,पिंपरी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत महापौर रविभाऊ लांडगे यांच्या अध्यक्षतेखाली शहरातील सर्व डॉक्टर असोसिएशनची अत्यंत महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.

या बैठकीत निमा आयुर्वेद फोरम सेंट्रल कौन्सिल,निमा आयुर्वेद फोरम पिंपरी चिंचवड,महाराष्ट्र आयुर्वेद संमेलन,आयुर्वेद व्यासपीठ,तसेच ग्लोबल आयुर्वेद प्रॅक्टिशनर या सर्व आयुर्वेदिक संघटनांनी सक्रिय सहभाग नोंदवून एकजुटीची ताकद दाखवली.

यावेळी महापौर यांच्या कडे विविध मागण्या मागण्यात आल्या यामध्ये मुख्य मागण्या खालील प्रमाणे

**मुख्य मागण्या:**महानगरपालिकेच्या सर्व रुग्णालयांमध्ये विभाग सुरू करणे स्वतंत्र हॉस्पिटलची स्थापना धन्वंतरी योजनेमध्ये आयुर्वेदाचा समावेश भोंदू आयुर्वेद डॉक्टरांवर कठोर कारवाई बैठकीदरम्यान डॉक्टरांच्या अडचणी संवेदनशीलतेने ऐकून नोंदणी प्रक्रियेत येणाऱ्या अडथळ्यांवर सखोल चर्चा करण्यात आली.प्रशासकीय प्रक्रिया अधिक सोप्या,पारदर्शक आणि प्रभावी करण्यासाठी सकारात्मक निर्णय घेण्यात आले.

या बैठकीस उपमहापौर शर्मिला बाबर,सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे,विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईरे,क्रिडा समिती सभापती कैलास कुटे,नगरसेवक कुशाग्र कदम,नगरसेविका वैशाली घोडेकर तसेच शहरातील मान्यवर डॉक्टर यावेळी उपस्थित होते.आयुर्वेदाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आणि नागरिकांना अधिक सक्षम आरोग्य सेवा देण्यासाठी हा एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरणार आहे.यावेळी वैद्य निलेश लोंढे अध्यक्ष,निमा आयुर्वेद फोरम सेंट्रल कौन्सिल उपस्थित होते.




